
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ    बीड महाराष्ट्र | रविवार, 20 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 129 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड, रविवार, 20 सप्टेंबर 2026

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# वान नदी वाचवा! नदीपात्राची लूट चालणार का?





## कथित अवैध उत्खननाविरोधात ॲड. अर्जुन सोळंके आक्रमक

## रेल्वे मार्गाच्या कामासाठी नदीपात्रातील गौण खनिजाचा कथित वापर प्रशासनाने कारवाई न केल्याने केले ठिय्या आंदोलन





**वान नदीपात्रातील नैसर्गिक गौण खनिजावर कुणाचा अधिकार? परवानगी आहे की नियमांना बगल देऊन उत्खनन सुरू आहे? असा सवाल उपस्थित करत ॲड . सोळंके यांनी तहसील कार्यालय, परळी येथे निवेदन दिले .**

**परळी वैजनाथ : प्रतिनिधी**

परळी-बीड रेल्वे मार्गाच्या कामासाठी नागापूर येथील वान नदीपात्रातून वाळू, मुरूम, दगड आणि गोट्यांचे कथितरित्या नियमबाह्य उत्खनन करून वापर केला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणावरून ॲड. अर्जुन सोळंके यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला असून, संबंधित रेल्वे कंत्राटदारावर तातडीने कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

वान नदीपात्रातील नैसर्गिक गौण खनिजावर कुणाचा अधिकार? परवानगी आहे की नियमांना बगल देऊन उत्खनन सुरू आहे? असा सवाल उपस्थित करत ॲड. सोळंके यांनी तहसील कार्यालय, परळी येथे निवेदन दिले.

आपल्या ठिया आंदोलनादरम्यान ॲड.अर्जुन सोळंके यांनी थेट तहसील कार्यालयातील दोन अधिकाऱ्यावरती आरोप केले आहेत की त्यांनी पैसे घेऊन गुत्तेदारास सहकार्य केले आणि त्यामुळेच त्या भागातील गुत्तेदाराने अवैध उत्खनन केले. त्यामुळे संबंधित जे अधिकार आहेत त्यांच्यावरती कारवाई करण्यात यावी असाही आरोप त्यांनी यावेळी केला.

नदीपात्रातील वाळू, मुरूम, दगड आणि गोटे ही नैसर्गिक संपत्ती आहे. या संपत्तीचे कथित अनधिकृत उत्खनन सुरू असल्यास त्याचा थेट परिणाम नदीच्या नैसर्गिक प्रवाहावर आणि पर्यावरणावर होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रेल्वे विकासाच्या नावाखाली नदीपात्राची लूट चालणार का? असा थेट सवाल उपस्थित करत या प्रकरणाची प्रशासनाने तातडीने चौकशी करावी, संबंधित कंत्राटदाराकडे गौण खनिज उत्खननासाठी आवश्यक परवानग्या आहेत का, याची पडताळणी करावी आणि नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने तक्रारीची दखल घेऊन ठोस कारवाई केली नाही, तर १७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या दिवशी परळी तहसील कार्यालयासमोर अजून झोपे आणि थेट या आंदोलन केले.

आता प्रशासन या तक्रारीची चौकशी करून वान नदीपात्रातील उत्खननाबाबत वस्तुस्थिती स्पष्ट करणार का? संबंधितांकडे वैध परवानग्या आहेत का? आणि नियमभंग आढळल्यास कारवाई होणार का? याकडे नागापूरसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

वान नदी ही केवळ नदी नाही, तर परिसराची नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्या संवर्धनाबाबत प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

# आ.सुरेश धस यांच्या संकल्पनेतून ‘रोज एक तास श्रमदानासाठी’ मोहिमेला आष्टीत उत्स्फूर्त प्रतिसाद!

## पिंपळेश्वर मंदिर परिसरातून आ.धस यांच्या हस्ते शुभारंभ; कर्जत येथील सर्व सामाजिक संघटनेच्या सदस्यांचा सहभाग

**आष्टी (प्रतिनिधी)**

शहर स्वच्छ, सुंदर, हिरवेगार आणि विकसित करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग असावा, या उद्देशाने आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतून ‘रोज एक तास श्रमदानासाठी’ या अभिनव लोकसहभागाच्या मोहिमेचा शुभारंभ पिंपळेश्वर मंदिर परिसरात करण्यात आला. या उपक्रमाला आष्टीकर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील या उपक्रमाचा मुख्य उद्देश शहराच्या स्वच्छतेसोबतच पर्यावरण संवर्धनाला चालना देणे आणि ‘माझे शहर, माझी जबाबदारी’ या भावनेतून नागरिकांना श्रमदानासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. प्रशासनाच्या प्रयत्नांना नागरिकांच्या सहभागाची जोड मिळाल्यास शहराचा कायापालट अधिक प्रभावीपणे होऊ शकतो, या विचारातून या मोहिमेची संकल्पना पुढे आली आहे.

दररोज एक तास श्रमदानाच्या माध्यमातून शहरातील विविध भागांमध्ये परिसर स्वच्छता, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन यांसारखी कामे केली जाणार आहेत. आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील ही मोहीम केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता नित्यनियमाने सुरू ठेवण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

या उपक्रमात शहरातील सर्व सामाजिक संघटना, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्वसामान्य नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, हा संदेश या मोहिमेतून देण्यात येत आहे.



विशेष म्हणजे कर्जत शहरातील सर्व सामाजिक संघटनेच्याच्या सदस्यांनीही आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील या उपक्रमाच्या शुभारंभास उपस्थित राहून श्रमदानात सहभाग नोंदविला. त्यांच्या या सहभागाबद्दल यावेळी सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. कर्जतच्या सामाजिक संघटनांनी आष्टीकरांना दिलेली ही प्रेरणा उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करणारी ठरली.

आष्टी शहरात सुरू झालेल्या या लोकसहभागाच्या उपक्रमाचा विस्तार पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यांतही लवकरच करण्यात येणार आहे. त्यामुळे आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील ‘एक तास श्रमदान’ ही चळवळ तीनही तालुक्यांमध्ये व्यापक स्वरूप घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

स्वच्छ, सुंदर आणि हिरवीगार आष्टी घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दररोज आपल्या वेळेतील एक तास श्रमदानासाठी द्यावा आणि आमदार सुरेश धस यांच्या संकल्पनेतील या लोकसहभागाच्या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. ‘एक तास श्रमदान... स्वच्छ आष्टीचा संकल्प!’ या भावनेतून सुरू झालेल्या या मोहिमेला मिळालेला नागरिकांचा प्रतिसाद पाहता आष्टीच्या स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने ही चळवळ महत्त्वपूर्ण ठरण्याची चिन्हे आहेत.

# ज्ञानदानाचा निस्सीम यज्ञ गाजवणार्या आदर्श शिक्षिका: श्रीमती अंजली कुलकर्णी

शिक्षण ही केवळ एक नोकरी नसून ते समाज घडवण्याचे एक पवित्र व्रत आहे, याचा प्रत्यय श्रीमती अंजली रेणुका वसंतराव कुलकर्णी यांच्या २२ वर्षांच्या प्रदीर्घ आणि निष्ठावंत सेवाकाळाकडे पाहताना येतो.परळी येथील भगवान प्राथमिक विद्यालयात त्यांनी २२ वर्षे सेवा केली आहे व सध्या अंबाजोगाई येथील कै. देवराव बाळाजी गणगे योगेश्वरी नूतन प्राथमिक विद्यालयात कार्यरत असलेल्या अंजली मॅडम यांनी आपल्या अविरत परिश्रमांतून शेकडो विद्यार्थ्यांचे आयुष्य प्रकाशमान केले आहे. त्यांच्या याच उत्तुंग आणि समर्पित शैक्षणिक व सामाजिक कार्याची कृतज्ञतापूर्वक नोंद घेत `मराठवाडा साहित्य परिषद, शाखा परळी वैजनाथ` यांच्या वतीने त्यांना `आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२६` देऊन गौरविण्यात आले आहे. हा सन्मान त्यांच्या अखंड ज्ञानयज्ञाचा यथोचित गौरव आहे.

प्राथमिक शिक्षण हा मानवी जीवनाचा सर्वात महत्त्वाचा पाया असतो. अंजली मॅडम यांनी इयत्ता पहिली ते चौथी पर्यंतच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांना मराठी व इंग्रजी सारख्या मूलभूत विषयांचे धडे देताना, त्यांच्यात पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञानाची भक्कम पायाभरणी केली आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाची गोडी कशी निर्माण करावी, याचे एक उत्तम उदाहरण त्यांनी घालून दिले आहे.




त्यांच्या अध्यापन पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शिक्षणात आणलेली आधुनिकता आणि सर्जनशीलता होय. `वाचन कट्टा`, `शैक्षणिक खेळ` आणि संगीत यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी बालमनाला आनंदी ठेवत शिक्षण प्रक्रियेत सामावून घेतले आहे. यामुळे खेळत-हसत शिकण्याची मुलांची प्रवृत्ती वाढीस लागली.

अंजली कुलकर्णी मॅडम या केवळ एक आदर्श शिक्षिका नसून एक संवेदनशील आणि सामाजिक भान जपणार्या सुजाण नागरिक आहेत. अनेकदा गरिबीमुळे हुशार विद्यार्थ्यांना आपले शिक्षण अर्धवट सोडावे लागते. हीच अडचण ओळखून त्यांनी अनेक गुणवंत व गरजू विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी स्वतःहून आर्थिक सहाय्य केले आहे. तसेच अखिल भारतीय पेशवा संघटनेच्या जिल्हाध्यक्षा च्या माध्यामातून अनेकाना मदतीचा हात दिला आहे . वधु वर मेळावे घेऊन अनेकांचे संसार त्यानी या माध्यामातून उभे केले आहेत.

विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची त्यांची ही वृत्ती त्यांचे सामाजिक दायित्व अधोरेखित करते.

एक उत्तम शिक्षक तोच असतो जो स्वतः सतत शिकत राहतो. अंजली मॅडम यांची साहित्यनिष्ठा आणि स्वतःला ज्ञानसमृद्ध ठेवण्याची वृत्ती वाखाणण्याजोगी आहे. वाचनाची हीच आवड त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांमध्येही रुजवली. अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाच्या धनी असलेल्या अंजली मॅडमला मिळालेला हा `आदर्श शिक्षक पुरस्कार` त्यांच्या त्यागाची, निष्ठेची आणि कष्टाची पावती आहे. त्यांचा हा ज्ञानदानाचा, संस्कारांचा आणि समाजसेवेचा प्रवास असाच अविरत आणि दिमाखात सुरू राहो, हीच या निमित्ताने त्यांना सदिच्छा!



# सरस्वती गणेश मंडळाचा सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांचा धडाका; 'माणुसकीची भिंत'सह विविध कार्यक्रमांचे आयोजन

अंबाजोगाई | प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सरस्वती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, गुरुवार पेठ, अंबाजोगाई यांच्या वतीने यंदा विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांची सुरुवात १४ सप्टेंबर २०२६ पासून झाली असून, सरस्वती कॉर्नर, गुरुवार पेठ येथे प्रमुख कार्यक्रम पार पडणार आहेत.

मंडळाच्या वतीने 'माणुसकीची भिंत' हा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत जुने कपडे, ग्रंथ, रद्दी पेपर तसेच ई-वेस्ट संकलित करण्यात येत आहे. 'नको असेल ते द्या, हवे असेल ते घेऊन जा' या संदेशातून गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. फिरत्या माणुसकीच्या भिंतीचे अनावरण प्रसाद दादा, शेख मुख्तार चाचू, रुपेश रामावत व शिवानंद हारंगुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

महंत महारुद्र महाराज खाडे शास्त्री संचलित शिवगड संस्थान, उमराई येथेही मंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुलांना खेळाचे साहित्य देण्यात आले. माजी नगराध्यक्ष महादुजी मस्के, प्रकाश बोरगावकर, शशिकांत नाना गायकवाड यांच्यासह सरस्वती गणेश मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.






गणेशोत्सव काळात महिलांसाठी कौशल्य शिबिर, रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर, अन्नदान, महिला सक्षमीकरण, शिलाई मशीन व मेकअप किट वाटप, सीड बॉल्स उपक्रम, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, योग-प्राणायाम, ज्येष्ठ नागरिकांना साहित्य वाटप आदी विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत.

तसेच क्रेडाईच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम कामगारांना सुरक्षा साहित्याचे वाटप, गरजू वस्त्यांमध्ये शालेय स्पर्धा व विविध वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. महिलांसाठी विशेष 'महिला होम मिनिस्टर' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, विजेत्यांसाठी विविध बक्षिसे व ट्रॉफी ठेवण्यात आल्या आहेत. याशिवाय 'कोण बनेल अंबाजोगाईचा होम मिनिस्टर?' या विशेष उपक्रमासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

रक्ताची गरज लक्षात घेता नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. प्रत्येक रक्तदात्यास स्व. प्रकाशचंदजी सुरजमलजी मुथा यांच्या स्मरणार्थ छोटीशी भेटवस्तू देण्यात येणार आहे.

विविध स्पर्धा व शिबिरांसाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून, सामाजिक उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रायोजकांनी मंडळाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

संपर्क : रचना परदेशी – 9422288898 अलोक मोदी – 9890774788 गौरव शर्मा – 9175022255 निलेश मुथा – 9422242083 योगेश परदेशी – 9420581251

# वीस दिवसापासून मोकाट असणाऱ्या डॉ.महेंद्र पटवाला अटक करा

## ग्रामस्थांचे कडा पोलीस चौकासमोर ठिय्या आंदोलन



आष्टी: प्रतिनिधी

कडा शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या १९ वर्षीय तरुणीशी केबिन बंद करून अश्लील कृत्य करणारा आरोपी डॉक्टर महेंद्र पटवाला २० दिवस उलटूनही अटक न झाल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला आहे. आरोपी डॉक्टरला तातडीने बेड्या ठोकण्याच्या मागणीसाठी शहरातील शेकडो संतप्त नागरिकांनी आज, शनिवारी (दि. १९) सकाळी कडा पोलीस चौकीत सुमारे दीड तास जोरदार ठिय्या आंदोलन केले. येत्या चार दिवसांत आरोपीला अटक न केल्यास कडा शहर बेमुदत बंद ठेवण्याचा आक्रमक पवित्रा नागरिकांनी घेतला आहे.

आष्टी तालुक्यातील कडा येथील एका खाजगी रुग्णालयात ३० ऑगस्ट रोजी ही घटना घडली होती. उपचारासाठी आलेल्या भावी शिक्षिका असलेल्या १९ वर्षीय तरुणीला डॉ. महेंद्र पटवा याने केबिनमध्ये बोलावून, दरवाजा आतून बंद करत तिच्याशी अश्लील कृत्य केले होते. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५(१) आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर झालेल्या मारहाणीत संबंधित डॉक्टर पटवाचा हात फ्रॅक्चर झाल्याने त्याच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, तब्बल २० दिवस उलटूनही आरोपीला अटक न झाल्याने शहरवासीयांमध्ये तीव्र असंतोष पसरला.

शनिवारी सकाळी १० ते ११:३० दरम्यान शेकडो नागरिकांनी पोलीस चौकीत ठिय्या मांडला. प्रशासनाने तात्काळ पावले उचलून आरोपीस गजाआड करावे, अशी मागणी करत चार दिवसांत कारवाई न झाल्यास कडा शहर बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. हे निवेदन परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे आणि कडा सहायक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

दरम्यान आंदोलकांची बाजू ऐकून घेत परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांनी जमावाला शांत केले. "पुढील ४ ते ५ दिवसांत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीला गजाआड केले जाईल," असे ठोस आश्वासन पोलीस प्रशासनाने दिले. या आश्वासनानंतर नागरिकांनी आपले ठिय्या आंदोलन मागे घेतले. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी, पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर, नंदकिशोर सवासे, अमोल नवले, गणेश भुतेकर, भारत गुजर, चंद्रमुनी बनसोडे, विकास जाधव, सद्दाम शेख, महिला अंमलदार मर्जीना शेख यांच्यासह होमगार्ड जवानांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# संगम येथे कोकाटे महाराजांच्या निवासस्थानी श्रींची महाआरती - सचिव हारणावळ यांच्या हस्ते आरती संपन्न



संगम (ता. परळी वैजनाथ) :- संगम येथे ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या निवासस्थानी विराजमान असलेल्या श्री गणरायाची महाआरती सचिव हारणावळ साहेब यांच्या हस्ते मोठ्या भक्तिमय वातावरणात करण्यात आली.

या मंगल प्रसंगी आरतीसाठी गावातील प्रतिष्ठित मान्यवर उपस्थित होते. यामध्ये माजी उपसरपंच हरिभाऊ गिराम, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय गिराम, संतोष कोकाटे, ज्येष्ठ व्यक्तिमत्व रावसाहेब चव्हाण,धोंडीराम आण्णा मुंडे, श्री चव्हाण, ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

आरतीनंतर गणेश मंडळाचे अध्यक्ष समर्थ शिवाजीराजे कोकाटे यांनी उपस्थित सर्व भाविकांचे, मान्यवरांचे आभार मानले. टाळ-मृदंगाच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

# आष्टीत शांतता समितीची बैठक वादळी गणेश मंडळांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना निमंत्रण नसल्याने नाराजी ; भर उन्हात नागरिकांना उभे राहण्याची वेळ



**आष्टी** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आष्टी पोलीस ठाण्यात आयोजित करण्यात आलेली शांतता समितीची बैठक शुक्रवारी वादळी ठरली. गणेश मंडळांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना बैठकीचे निमंत्रण न मिळाल्याने संबंधित पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, भर उन्हात बैठक आयोजित केल्याने अनेक नागरिकांना उभे राहण्याची वेळ आली.

बैठकीसाठी आलेल्या नागरिकांना बसण्यासाठी पुरेशा खुर्च्यांची व्यवस्था नसल्याने अनेकांना उभे राहावे लागले. दुसरीकडे पोलीस ठाण्याच्या आवारातील उपलब्ध खुर्च्यांवर नव्याने नियुक्त झालेले काही पोलीस पाटील कर्मचारी बसलेले असल्याचे उपस्थितांनी सांगितले. त्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

गणेशोत्सव हा सामाजिक सलोखा आणि शांततेचा उत्सव असताना शांतता समितीच्या बैठकीतच गणेश मंडळांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना डावलले जात असल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आला.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# सामाजिक उपक्रमातून सुकळी येथे गणेशोत्सव उत्साहात ; ५१ जणांचे रक्तदान, वृक्षारोपण अन् आरोग्य जागरूकता

**सिरसाळा (अतुल बडे)**

केवळ वर्गणी आणि मिरवणुकीपुरता गणेशोत्सव मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकी जपत सुकळी येथील जय हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने यंदाही विविध सामाजिक उपक्रमांनी गणेशोत्सव साजरा केला. मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सुकळी येथील हे मंडळ मागील आठ वर्षांपासून सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवत आहे. यंदाही गणेशोत्सवानिमित्त डीजे मुक्त मिरवणूक, महिलांसाठी आरोग्यविषयक जागरूकता शिबिर, वृक्षारोपण, कीर्तन तसेच विविध सामाजिक विषयांवरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजय बुरांडे होते. उद्घाटक म्हणून ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सिरसाळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, राष्ट्रमाता जिजाऊ शिक्षण संस्थेचे संस्थापक सचिव अनिल जाधव, सुकळीचे सरपंच संतोष सौंदनकर, दैनिक लोकमतचे पत्रकार राजेंद्र पांडे, हिंदवी न्यूज नेटवर्कचे संपादक बाळासाहेब गरड, धनगर सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गोरखदादा काळे, राष्ट्रवादी काँग्रेस युवक तालुकाध्यक्ष यश भैय्या जाधव आणि दत्ता शेळके यांची उपस्थिती होती.





■ **मंडळ पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

कार्यक्रमास जय हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष हनुमान झोडगे, उपाध्यक्ष राधाकिसन लव्हाळे यांच्यासह मंडळाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदानाला जात-धर्म नसतो : ॲड. अजय बुरांडे यावेळी बोलताना ॲड. अजय बुरांडे म्हणाले, "सुकळी गावातील तरुणांनी सामाजिक उपक्रमांचा घेतलेला वसा कौतुकास्पद आहे. रक्तदान हे जात-धर्म पाहत नाही; त्याचा उपयोग केवळ माणुसकीसाठी होतो. जातीय सलोखा टिकवून ठेवण्यासाठी असे उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहेत."

■ **तरुणांनी संघटित व्हावे : श्यामसुंदर महाराज**

श्यामसुंदर महाराज सोन्नर यांनी तरुणांना मार्गदर्शन करताना सांगितले, "उत्सव हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून संस्कार आणि संघटनाचे माध्यम आहे. गावातील सर्व तरुणांनी एकत्र येऊन असेच सामाजिक कार्य करावे. यातून गावाचा आणि समाजाचा विकास होतो."

■ **गावाच्या एकजुटीतून चांगले कार्य : बाबा राठोड**

सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड यांनी गावातील एकजुटीचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, "गावात एकजूट असेल तर कोणतेही चांगले कार्य सहज शक्य होते. सुकळी गावाने मागील आठ वर्षांपासून डीजे मुक्त मिरवणुकीचा संकल्प कायम ठेवून नवा आदर्श निर्माण केला आहे."

■ **डीजे मुक्त गणेशोत्सवाचे कौतुक : अनिल जाधव**

अनिल जाधव म्हणाले, "आजच्या तरुण पिढीसमोर डीजे आणि दिखाव्याचे आकर्षण असताना सुकळीच्या तरुणांनी डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे."

या उपक्रमांना सुकळी गावातील शेतकरी, तरुण तसेच पंचक्रोशीतील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. रक्तदान शिबिरात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

दरम्यान, गणेशोत्सवातील विविध सामाजिक उपक्रमांचे उत्कृष्ट आणि शिस्तबद्ध नियोजन केल्याबद्दल मंडळाचे मार्गदर्शक तथा पत्रकार अशोक गलांडे यांचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

# विघ्नहर्ता गणेश मंडळ देऊळगाव घाट लमान तांडा मंडळा तर्फे सुंदर हस्ताक्षर स्पर्धा संपन्न

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

आष्टी तालुक्यातील देऊळगाव घाट लमानतांडा येथील विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने सालाबाद प्रमाणे याही वर्षी शालेय विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. शालेय विद्यार्थ्यांच्या हस्तक्षर कलेस वाव मिळावा या हेतूने या स्पर्धा दरवर्षी घेतल्या जातात... या स्पर्धेत 15 मुलींनी भाग घेतला होता.. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लमान तांडा शाळेचे मुख्याध्यापक गवंडे सर, माळी सर, सुरेश पवार सर, अरुण चव्हाण सर, आदी उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये पुढील प्रमाणे स्पर्धक यशस्वी ठरले.

- **लहान गट इयत्ता पाचवी ते सातवी**
- **प्रथम: अभिषेक पोपट पवार**
- **द्वितीय : श्रावणी पोपट चव्हाण.**
- **तृतीय : परी पोपट राठोड.**

या तिन्ही मुली श्री ज्ञानेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय देऊळगाव घाट लमाण तांडा येथील आहे. या मुलींना जे बक्षीस दिले हे पवार तुकाराम सिताराम यांच्यातर्फे होते.

- **मोठा गट गट इयत्ता आठवी ते बारावी**
- **प्रथम : प्राची पोपट पवार**
- **द्वितीय : प्रीती पोपट पवार**
- **तृतीय : तन्नवी संतोष पवार**

सर्व मुली श्री ज्ञानेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय देऊळगाव घाट लमान तांडा येथील आहेत. या मुलींना जे बक्षीस दिले ते चव्हाण अविनाश रमेश यांच्यातर्फे होते.

यावेळी देऊळगाव घाट लमानतांड्यातील सर्व नागरिक व विघ्नहर्ता गणेश मंडळाचे सर्व कार्यकर्ते व युवक सर्व उपस्थित होते. यावेळी लमन तांड्याचे सरपंच राजू चव्हाण, अंकुश पवार, आदिनाथ पवार, संतोष चव्हाण, कुणाल चव्हाण, बाबा चव्हाण, आसाराम चव्हाण, हरिभाऊ चव्हाण, मोहन पवार, साहेबराव चव्हाण, अविनाश चव्हाण, आदि नागरिक उपस्थित होते.

या स्पर्धेतील मुलींचे नंबर काढण्याची जबाबदारी ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चे मुख्याध्यापक गवंडे सर यांनी पार पाडली. या स्पर्धेतून मुलांना एक प्रकारचे प्रोत्साहन भेटणार आहे. आणि मुलांना एक प्रकारे वाव भेटणार आहे.

# स्व.संपत दादा सांगळे यांनी संपत्ती पेक्षा माणसे जास्त जोडली : बबन महाराज

**आष्टी : प्रतिनिधी**

कडा येथील माजी सरपंच स्व. संपत दिनकरराव सांगळे यांचे गतवर्षी हृदयविकाराच्या झटक्याने अकाली निधन झाले. त्यांचे जाण्याचे वय नव्हते; मात्र नियतीपुढे कोणाचेही काही चालत नाही. स्व. संपतदादा सांगळे यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून आणि आपुलकीच्या स्वभावातून तालुक्यासह कोकणापर्यंत मोठा मित्रपरिवार जोडला होता. त्यांनी संपत्तीपेक्षा माणसे अधिक जोडली, असे प्रतिपादन ह.भ.प. बबन महाराज बाहिरवाल यांनी केले.

ह.भ.प. बबन महाराज बाहिरवाल म्हणाले की, स्व. संपतदादा सांगळे यांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि परिचितांवर मोठे दुःख कोसळले आहे. त्यांच्या जाण्याला वर्ष उलटले असले तरी त्यांच्या आठवणी आजही सर्वांच्या मनात कायम आहेत. कडा येथील सरपंचपदाची जबाबदारी त्यांनी सक्षमपणे सांभाळली. व्यवसायातही त्यांनी चांगली प्रगती साधली होती. मात्र या सर्वांपेक्षा माणसे जोडण्याला त्यांनी अधिक महत्त्व दिले.



त्यांच्या स्मृतींना उजाळा देताना बबन महाराजांनी स्व. संपतदादा सांगळे यांच्या सामाजिक जिव्हाळ्याचे आणि माणुसकीचे विविध पैलू उपस्थितांसमोर मांडले. त्यांच्या कार्यातून आणि जीवनातून माणसे जोडण्याचा आदर्श समाजाने घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी माजी आमदार बाळासाहेब आजबे, युवा नेते जयदत्त धस.बाबासाहेब गुंजाळ,संपतराव म्हस्के,सभापती संजय ढोबळे,अनिल ढोबळे,नामदेव राऊत,बनसोडे अण्णा,संदीप खकाळ,राम मधुरकर,नेटके मेजर,प्राचार्य हरिदास विधाते,विक्रम पोकळे,मुळे,शामशेठ धस,किशोर नाना हंबरडे,पोलीस निरीक्षक दिनेश आहेर,दत्ताभाऊ साखरे,नीलकंठ महाराज तावरे,पोपट घुले,शिवराज पाटील,अनिल शिंदे,पत्रकार उत्तम बोडखे,संतोष सानप,शरद तळेकर,प्रवीण पोकळे,सचिन रानडे,गोवर्धन जाधव,नितीन कांबळे,समीर शेख ,बाम पवार,पवार महाराज,शिवाजी कर्डीले ,राजाभाऊ शेळके,अशोक चोभे,दादा महाराज चांगुने,आडसरे महाराज,प्रा शाम सांगळे,बबनराव औटे,राजाबापू कर्डीले,बबलू पानसरे,धैर्यशील थोरवे,प्राचार्य शिवाजी ढोबळे,आदि मान्यवर उपस्थित होते.

# ना. पंकजाताई मुंडे, डॉ. प्रितमताई मुंडे लालबाग राजाच्या चरणी नतमस्तक



**मुंबई** | राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ प्रितमताई मुंडे यांनी आज परिवारा समवेत लालबागचा राजा आणि चिंचपोकळीच्या श्री चिंतामणीचे दर्शन घेतले. ना. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ प्रितमताई मुंडे, आर्यमान पालवे, अगस्त्य खाडे यांनी आज संध्याकाळी लालबागच्या राजा म्हणून प्रसिद्ध असलेल्या गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी आरती प्रसादाचा त्यांनी लाभ घेतला.यावेळी लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातर्फे त्यांचा आदरपूर्वक सत्कार करण्यात आला. चिंचपोकळीच्या श्री चिंतामणीचेही त्यांनी दर्शन घेतले. सर्वांना सुख, समृद्धी, ऐश्वर्य, शांती, आरोग्य लाभो अशी प्रार्थना ना. पंकजाताई मुंडे यांनी बाप्पाच्या चरणी केली.

# आष्टीच्या जय हनुमान तालीमच्या पैलवानांची तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत दमदार कामगिरी

**आष्टी (प्रतिनिधी)** : आष्टी येथे पार पडलेल्या शालेय तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत जय हनुमान तालीमच्या पैलवानांनी दमदार कामगिरी करत कुस्ती क्षेत्रात आपली छाप पाडली. तालीमच्या तब्बल दहा पैलवानांनी आपल्या-आपल्या वजनगटात प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले असून, या सर्वांची बीड येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या स्पर्धेत भैरवनाथ हरिभाऊ तोडकर (३५ किलो), तेजस रवींद्र रंधवे (३८ किलो), कन्हैया लक्ष्मण गोल्हार (४४ किलो), रितेश बिभीषण गुजर (४५ किलो), ओम हनुमंत कडू (४८ किलो), कुणाल बिभीषण गुजर (४८ किलो), तुषार कैलास शिंदे (५१ किलो), गौरव संतोष सायकड (५५ किलो), शिवम अशोक परजणे (५७ किलो, शिरूर तालुका) आणि समर्थ परसराम भवर (६८ किलो) यांनी प्रथम क्रमांक पटकावला.



या यशाबद्दल सर्व विजेत्या पैलवानांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच त्यांच्या पालकांसह जय हनुमान तालीमचे प्रशिक्षक प्रवीण दहिया व सर्व सहकाऱ्यांचा तालीमचे अध्यक्ष सतीश आबा शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बीड येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी सर्व पैलवानांना शुभेच्छा देण्यात आल्या. युवा पैलवानांनी मिळवलेल्या या यशामुळे आष्टीच्या कुस्ती क्षेत्रातील गौरवशाली परंपरेला आणखी बळ मिळाले असून, या पैलवानांनी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर आष्टीचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूल आमणीचे जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो स्पर्धेत घवघवीत यश

**महागाव प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा परिषद, यवतमाळ तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धा दि. १६ व १७ सप्टेंबर रोजी जिल्हा क्रीडा संकुल, नेहरू स्टेडियम, यवतमाळ येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूल, आमणी, ता. महागाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल केले.

१४ वर्षे वयोगटातील तायक्वांदो स्पर्धेत ३८ ते ४१ किलो वजनगटात शिवम किशोर जाधव, ३५ ते ३८ किलो वजनगटात श्रेयश मनोज राठोड आणि २९ ते ३२ किलो वजनगटात शरयू किशोर जाधव यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले. या तिन्ही सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंची आगामी विभागीय शालेय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

तसेच १७ वर्षे वयोगटात ३२ ते ३५ किलो वजनगटात आराध्य दत्तराव आढाव आणि ४६ ते ४९ किलो वजनगटात भाविका मंचकराव कदम यांनी दमदार कामगिरी करत रौप्यपदक मिळविले.

विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या सचिव श्रीमती वनमालाताई राठोड, मुख्याध्यापक अभिषेक राठोड, शिक्षक समन्वयक वैष्णवी अभिषेक राठोड, क्रीडा शिक्षक तथा तायक्वांदो प्रशिक्षक मारुती बाभळे, सर्व शिक्षकवृंद तसेच पालकांनी पदकविजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच आगामी विभागीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे प्रियदर्शनी कॉन्व्हेंट स्कूल, आमणीच्या क्रीडा क्षेत्रातील गुणवत्तेला नवी ओळख मिळाली असून शाळेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.





दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, रविवार, 20 सप्टेंबर 2026




# परळीकरांच्या फिटनेसला मिळणार नवा 'बूस्ट'!

## अत्याधुनिक मशिनरी, आकर्षक इंटेरियर अन् अद्ययावत सुविधांनी सज्ज 'युवा फिटनेस सेंटर' आजपासून सेवेत

### फिटनेसप्रेमींसाठी नवे आकर्षण

**आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत व्यायाम आणि तंदुरुस्तीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ही गरज लक्षात घेऊन युवा फिटनेस सेंटरमध्ये आधुनिक उपकरणांसह व्यायामासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. युवा पिढीपासून सर्व वयोगटातील नागरिकांमध्ये नियमित व्यायामाची सवय निर्माण व्हावी आणि आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. परळी शहरातील फिटनेस क्षेत्रात आधुनिक सुविधांची भर घालणाऱ्या 'युवा फिटनेस सेंटर'चा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ऑल इंडिया युनिव्हर्सिटी चॅम्पियन, ज्युनियर महाराष्ट्र श्री व नाशिक श्री शेखर मनमथअप्पा सुगरे यांनी केले आहे.**

**अधिक माहितीसाठी संपर्क : 9881182005 येथे संपर्क साधावा.**

परळी / प्रतिनिधी :

परळी शहरातील वाढत्या फिटनेस क्रेझला नवे बळ देणाऱ्या 'युवा फिटनेस सेंटर' या अत्याधुनिक युनिसेक्स जिमचा भव्य शुभारंभ आज, दि. 20 सप्टेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता होणार आहे. एचडीएफसी बँकेजवळ, मोंढा मार्केट परिसरात सुरू होत असलेले हे फिटनेस सेंटर अत्याधुनिक व्यायाम मशिनरी, सुसज्ज सुविधा आणि आकर्षक इंटेरियरने सज्ज असून, फिटनेसप्रेमींसाठी हे नवे आकर्षण ठरणार आहे. परळी शहरात 21 वर्षांपूर्वी लावलेल्या रोपट आज अत्याधुनिक सामग्रीमध्ये नव्याने सुरू होत आहे

या भव्य शुभारंभ सोहळ्याचे उद्घाटन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी तसेच माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव भैय्या भैय्या धर्माधिकारी यांच्या हस्ते होणार आहे. युवा फिटनेस सेंटरचे मुख्य आधारस्तंभ प्रमोद वेरूळे (भाऊजी) यांच्या मार्गदर्शनाखाली हा शुभारंभ सोहळा संपन्न होणार असून

शुभारंभ सोहळ्यास महाराष्ट्र बॉडी बिल्डिंग असो. चे उपाध्यक्ष गोपाळ गायकवाड (सर), फिटनेस कोच अँड न्यूट्रीशनिस्ट, नांदेडचे अमन कोंका (सर),पद्मावती शिक्षण संस्था, परळी वै. चे सचिव दीपकराजे तांदळे, सारंग पुजारी (माजी उपनगराध्यक्ष, अंबाजोगाई ), परळी नगरसेवक सचिन सारडा, भीमराव (गुरु) डावरे, सौ. अश्विनीताई राहुल केंदे, लक्ष्मण (पिंटू) मुरकुटे यांच्यासह युवा नेते निळकंठ चाटे, सोमनाथअप्पा महाजन, पत्रकार संजय खाकरे, चेतन (सर) सोंदळे, डॉ. वैभव दुबे, डॉ. दुष्यंत देशमुख,ज्येष्ठ क्रीडा शिक्षक सुभाष नाणेकर (सर) आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

■ -JERAI, Aerofit च्या आधुनिक उपकरणांची भव्य रेंज

युवा पिढीसह विविध वयोगटातील नागरिकांना आरोग्यदायी जीवनशैलीसाठी आधुनिक व्यायाम सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने युवा फिटनेस सेंटरची उभारणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, येथे JERAI आणि Aerofit या कंपन्यांची आधुनिक आयात केलेली व्यायाम उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यामुळे व्यायामप्रेमींना अत्याधुनिक साधनसामग्रीच्या माध्यमातून आपल्या फिटनेसवर काम करण्याची सुविधा एकाच छताखाली मिळणार आहे.







# स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्काराचे आज वितरण!

## कवी डॉ. विठ्ठल वाघ यांना डॉ. विश्वास पाटील यांच्या हस्ते प्रदान केला जाणार

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचा दरवर्षी दिला जाणारा स्व. भगवानरावजी लोमटे स्मृती राज्य पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ कवी व साहित्यिक प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना आज सुप्रसिद्ध गांधीवादी विचारवंत डॉ. विश्वास पाटील यांच्या हस्ते व ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख यांच्या उपस्थितीत प्रदान केला जाणार आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आंबेजोगाई येथील राजकारणी, समाजकारण, साहित्य, संस्कृती, संगीत,शिक्षण आदी क्षेत्रात उतुंग कार्य केलेले स्व. भगवानरावजी लोमटे यांच्या स्मृतिपित्यर्थ दरवर्षी साहित्य, संगीत, पत्रकारिता, सुसंस्कृत राजकारणी, क्रीडा, सिनेमा - नाट्य, शिक्षण आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या एका मान्यवरास हा पुरस्कार स्वर्गीय भगवानराव लोमटे यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जातो यावर्षी हा १४ वा पुरस्कार सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना दिला



जाणार आहे.

त्यांच्या साहित्याने मराठी ग्रामीण साहित्याला एक वेगळी ओळख आणि नवा आयाम प्राप्त करून दिला आहे. त्यांच्या प्रसिद्ध "काया मातीत मातीत" या काव्यसंग्रहातील शीर्षकातूनच त्यांच्या काव्यविश्वाचे स्वरूप स्पष्ट होते. त्यांनी इंदौर येथे एम. ए. मराठी शिक्षण घेतले व संत गाडगे बाबा विद्यापीठ नागपूर येथून "पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास" याविषयात पी.एच.डी. प्राप्त झाली.

कपाशीची चंद्रफुले, पाऊसपाणी, गावशिव, पंढरीच्या वाटेवर, काया मातीत मातीत, वैदर्भी, साय, वृषभसूक्त, मातीचा झरतो डोळा,

मायबाप हे कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. डेबू व डेबूजी प्रमुख कादंबऱ्या आहेत. चित्रपट गीत लेखन, पटकथा लेखन, अंधारयात्रा हे नाटक खूप गाजले होते. पहाडी आवाजात कविता सादर करणारे कवी म्हणून रसिकांना ते आवडतात.

त्यांचा जन्म हिंगणी ता. तेल्हारा जिल्हा अकोला येथे झाला. निवृत्ती नंतर सध्या ते पुण्यात वास्तव्य करतात. त्यांचा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात सुरुवाती पासून सहभाग राहिला आहे. भगवानराव लोमटे व त्यांची मैत्री सर्वश्रुत आहे. विठ्ठल वाघ यांनी महाराष्ट्रभर कवितेचे कार्यक्रम करून भाषा वृध्दी व प्रसाराचे कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊन यावर्षीचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पहार, रोख पंचवीस हजार रुपये असे आहे.

यापूर्वी हा पुरस्कार, यशवंतराव गडाख पाटील, विजय कुवळेकर, पद्मश्री ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, पं. नाथराव नेरळकर, विजय कोलते, मधुकर भावे, उल्हास दादा पवार, प्राचार्य रा. रं. बोराडे व पद्मश्री डॉ. यु. म. पठाण, प्रा. भास्कर चंदनशिव, पद्मश्री डॉ. सतीश आळेकर व डॉ. वासुदेव मुलाटे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

या वर्षीचा चौदावा पुरस्कार कवी डॉ. विठ्ठल वाघ यांना रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठिक ५ वाजता आद्यकवी मुकुंदराज सभागृह, अंबाजोगाई येथे प्रख्यात साहित्यिक व गांधीवादी विचारवंत प्राचार्य डॉ . विश्वास पाटील, शहादा यांच्या हस्ते व ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, बीड यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येईल. अशीही माहिती दगडू लोमटे यांनी दिली. या कार्यक्रमास सर्वां नागरिक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन, समितीचे सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे, सहसचिव प्रा. सुधीर वैद्य, कोषाध्यक्ष सतीश लोमटे, सदस्य सर्वश्री डॉ. प्रकाश प्रयाग, प्रा. भगवान शिंदे, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, त्र्यंबक पोखरकर आणि राजपाल लोमटे यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहाय्यता निधीतून आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश; चार रुग्णांना 3 लाखांची मदत

**आष्टी (प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री सहायता निधी योजनेतून आष्टी विधानसभा मतदारसंघातील गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. आष्टी व शिरूर कासार तालुक्यातील चार रुग्णांच्या वैद्यकीय उपचारासाठी एकूण ३ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.

आष्टी तालुक्यातील खुंटेफळ (पुंडी) येथील दिपाली अगासे यांच्या नवजात बाळाच्या उपचारासाठी ५० हजार रुपये मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर करण्यात आले आहेत. नवजात बाळाच्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या वैद्यकीय खर्चामुळे कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली होती. अशा परिस्थितीत मिळालेल्या मदतीमुळे उपचारासाठी मोठा आधार मिळणार आहे.

तसेच डोंगरगण, ता. आष्टी येथील कल्पना पवार यांच्या जुळ्या नवजात



बाळांच्या उपचारासाठी प्रत्येकी ५० हजार रुपये, अशी एकूण १ लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे. दोन्ही बाळांच्या वैद्यकीय उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर ही मदत कुटुंबासाठी दिलासादायक ठरणार आहे.

याशिवाय शिरूर कासार येथील अनुशा सवासे यांच्या वैद्यकीय उपचारासाठी ५० हजार रुपयांची मदत मुख्यमंत्री सहायता निधीतून मंजूर करण्यात आली आहे.

या चारही प्रकरणांमध्ये आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या पाठपुराव्यामुळे मुख्यमंत्री सहायता निधीतून एकूण ३ लाख रुपयांची मदत मंजूर झाली आहे. विशेषतः नवजात व जुळ्या बाळांच्या उपचारासाठी आर्थिक मदत मंजूर झाल्याने संबंधित कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गरजू रुग्णांना गंभीर आजार किंवा उपचाराच्या काळात आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागू नये, यासाठी मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य दिले जाते. या योजनेचा लाभ मतदारसंघातील गरजू रुग्णांना मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात असल्याचे या प्रकरणांतून दिसून येते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून मिळणाऱ्या मुख्यमंत्री सहायता निधीचा लाभ आष्टी विधानसभा मतदारसंघातील गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविण्यासाठी आ.सुरेश धस यांच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या पाठपुराव्यामुळे अनेक कुटुंबांना उपचाराच्या काळात आर्थिक आधार मिळत आहे.

या रुग्णांना आमदार सुरेश धस यांचे ऑफिसमधून रुग्णसेवक अमर वाळके, विकास साळवे, शरद रेडेकर यांनी मदत केली.

# विना वाद्य बाप्पाचे विसर्जन; फोटोग्राफर संघटनेची गांधीगिरी

**आष्टी (प्रतिनिधी)** : गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत बँजो व साऊंड सिस्टीमला परवानगी नाकारण्यात आल्याच्या पार्श्वभूमीवर आष्टी तालुका फोटोग्राफर संघटनेने अनोख्या पद्धतीने 'गांधीगिरी' करत प्रशासनाचे लक्ष वेधले. संघटनेचे पदाधिकारी व सदस्य काळे कपडे परिधान करून, तोंडाला काळ्या फिती बांधून आणि हातात ध्वनी क्षेपकाचे संदेश देणारे फलक ज्यामध्ये 'रिकामा ढोल पण भावना भरपूर, वाद्यांना परवानगी नाही म्हणून यंदाची मिरवणूक शांत,ढोल शांत पण भक्ती नाही,आवाज शून्य पण भावना शंभर टक्के,या आशयाचे हातात फलक घेऊन विना वाद्य गणरायाच्या विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले.

गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत ढोल-ताशे, बँजो आदी वाद्यांमुळे दरवर्षी उत्साहाचे वातावरण निर्माण होत असते. मात्र यंदा बँजो पथकाला परवानगी देताना प्रशासनाने किचकट नियमावली घालून दिल्याचे सांगत तेवढे तरी वाद्य कशासाठी वाजवायचे असे फोटोग्राफर संघटनेने मत व्यक्त केले.शिवाय या निर्णयामुळे सर्व वाद्य कलावंत व गणेश मंडळांमध्ये तीव्र चिड आणि नाराजी निर्माण झाल्याची भावना मनात असल्याचे देखील आष्टी शहरातील मंडळांच्या सदस्यांनी सांगितले. याच पार्श्वभूमीवर फोटोग्राफर संघटनेने कोणतेही वाद्य न वाजवता शांततेच्या मार्गाने गांधीगिरी करत गणरायाचे मनोभावे पूजन करत विसर्जन केले.

तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून सदस्यांनी कोणतीही घोषणाबाजी न करता केवळ भक्तिभावाने गणरायाचे विसर्जन केले. 'विरोध आहे, मात्र उत्सवाच्या शांततेला धक्का नको', असा संदेश या रॅलीच्या माध्यमातून यावेळी दिसून आला.

प्रशासनाने उत्सवाची परंपरा, नागरिकांच्या भावना तसेच कलाकार व संबंधित व्यावसायिकांच्या अडचणींचा विचार करून वाद्यांबाबतच्या नियमांचा फेरविचार करावा, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली. काळ्या फिती बांधून शांततेत केलेल्या या गांधीगिरीची शहरात दिवसभर चर्चा होती.

### बँजोला परवानगी नाकारल्याने काळ्या फिती लावून मूक निषेध

